# सत्यउपासक
## साप्ताहिक वार्तापत्र

RNI No. MAHMAR/2023/88729 DEC. No. SDM/SR/PUNE/32/2023 Dt.26/07/2023



सा. सत्यउपासक
च्या तमाम सुज्ञ वाचक, लेखक जाहिरातदारांना व सभासदांना
सा. सत्यउपासक परिवाराकडून
दिपावली व नुतन वर्षाच्या
हार्दिक व मन:पूर्वक शुभेच्छा!



वर्ष २ ❁ अंक १६ ❁ साप्ताहिक ❁ पुणे, गुरूवार, १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२४ ❁ पाने ४ ❁ किंमत ३ रूपये


# कागदावरचे राज्य....

# भपकेबाज प्रचार, फाजील खर्च, आणि जनतेसाठी फक्त कागदावरचे राज्य?

# शेतकऱ्यांचे कष्ट, त्यांची मरणे, कागदी वचनांनी त्यांना अंधारात सोडले!




अतिश साळुंके (संपादक)


**पंतप्रधानांनी सत्ताधारी पक्षाचा प्रचार करताना हम एक है तो सेफ है असा नारा दिला, आणि राज्यातील शेतकऱ्यांसाठी नवीन आश्वासन दिले की राज्यात महायुती सरकार आल्यास शेतकऱ्यांना वार्षिक १२,००० रुपये ऐवजी १५,००० रुपये दिले जातील. हे आश्वासन पूर्वी दिलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या वचनाच्या पार्श्वभूमीवर दिले गेले आहे का? शेतीशी संबंधित वाढती महागाई, जीएसटीचा बोजा, खते, बी–बियाणे यांच्या वाढत्या किंमती, पिक विमा तील फोलपणा, अनैतिक आयात निर्यात धोरण, हमीभाव यावरील शाश्वत उपाययोजनांचे काय?**

**लोकशाहीची** पहिली पायरी हा देशाचा नागरिक अर्थातच मतदार असला तरी मदर ऑफ डेमोक्रसी मधील या मतदाराला जात, धर्म आणि आरक्षण यामध्ये विभाजित केले असून आर्थिक विषमता, महागाई आणि बेरोजगारी यासारख्या मूळ प्रश्नांविरोधात मतदार एकजूट होणार नाही याची पूर्ण दक्षता घेतली जात आहे, देशातील निवडणुका केवळ जाती, धर्म, धार्मिक आस्था आणि भावना यावरच कशा केंद्रित राहतील हाच अजेंडा सर्वच राजकीय पक्षांचा असल्याचे दिसून येत असून, देशातील एकूण संपत्तीच्या ऐंशी टक्के संपत्ती ही केवळ दहा टक्के उद्योगपतींच्या तिजोरीत बंद झाली असून लोकशाही ही भांडवलदार आणि उद्योगपतींच्या दावणीला तर बांधली गेली नाही ना? असा प्रश्न पडतो. यासोबतच जिसकी लाठी उसकी भैस या नीतीचा अवलंब करून पक्षांच्या विस्तारवादी भूमिकेमुळे सभ्यता, शिष्टाचार, तत्त्व यांना पायदळी तुडवले जात आहे, यातून देशाचा सर्वांगीण विकास न होता एकाधार शाहीकडे देशाची वाटचाल चालू आहे का? असे ही वाटते. या आकड्यांच्या राजकारणामुळे गेल्या काही वर्षांपासून सामान्य जनता भरडली जात आहे.

सद्यस्थितीला राज्यातील विधानसभा निवडणुक अंतिम टप्प्यात आली असून, राजकीय रणधुमाळीत राजकिय आखाड्यात गेल्या काही दिवसात सत्ताधाऱ्यांकडून शह देण्यासाठी आश्वासनांची पेरणी, योजनांचा पाऊस मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून आले, परंतु जाहिरात बाजी आणि योजनांच्या रणधुमाळी मध्ये सत्ताधाऱ्यांकडून महागाई, बेरोजगारी, आर्थिक विषमता, महिला अत्याचार, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि हमीभाव, राज्यावर वाढत चाललेले कर्ज, राज्यातून स्थलांतर होत असलेले उद्योगधंदे, भ्रष्टाचार हे शाश्वत मुद्दे गायब असून सत्ताधाऱ्यांनी फक्त विरोधी पक्षांच्या सत्तेतील कालावधीतील घटना, जातीय तेढ आणि इतिहासातील दाखले, आरक्षण या मुद्द्यांना केंद्रित करून एकीकडे योजनांचे लाभार्थी निर्माण करून दुसरीकडे मात्र मुक्त हस्ताने भांडवलदारांना खैराती वाटल्या!

खरे तर विकासाचे निर्णय सर्वसामावेशक, सर्वव्यापक आणि जात, प्रांत, धर्म यामध्ये कुठलाही भेदभाव न करता झाले पाहिजे परंतु सध्याच्या राजकारणात वैयक्तिक राजकीय स्वार्थ आणि राजकीय महत्त्वकांक्षे पुढे अशा तात्विक गोष्टी दुरापक्ष झाल्या आहेत! असे वाटते.

निवडणूक काळामध्ये एका मतदारासाठी रोज २० फोन कॉल्स,केवळ फोन कॉल्सच नाहीत, तर रस्त्यांवरील भव्य सभा, एलईडी वॉल्स, महागडी ध्वनिव्यवस्था, प्रकाशयोजना, आणि लाखोंच्या मांडवांसाठी खर्च, पक्ष कार्यकर्त्यांसाठी रोजचे भोजन, राहण्याची सोय आणि अनेक वेळा भाडोत्री श्रोते आणि कार्यकर्ते यांची नियुक्ती हीच वास्तविकता आदर्श आचारसंहितेचे उद्दिष्ट बाजूला सारते का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मतदारसंघातील धनदांडग्या पक्षांच्या जोरावर सामान्य मतदारांचा आवाज दाबला जात आहे का? निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या खर्च मर्यादांचा आदर होत आहे का? यातच निवडणूक प्रचारातील वक्तव्यांचा आणि घटनांचा विचार केला तर यामध्ये महासत्तेतील काही बोलके पोपट साम–दाम–दंड–भेद याचा वापर करून जनतेची आपापसात झुंज लावून जनतेला गुंतवून ठेवण्याचे काम करत असून मूळ मुद्द्यांपासून जनतेची दिशाभूल करत आहेत,काही महाभाग तर महापुरुषांसोबत वास्तव्य केले असल्याप्रमाणे स्वत:चे विचार अथवा आपल्या पक्षांची राजकीय (धार्मिक अजंडे) मते महापुरुषांच्या नावाने सोशल माध्यमांचा वापर करून अथवा भाषणांमधून स्वकल्पित दाखले देऊन पसरवत आहेत आणि निष्पाप जनता याच्या आहारी जाऊन त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि धार्मिक ध्रुवीकरणाच्या सुप्त अजेंड्याला बळी पडत आहे का? असे वाटते.

निवडणुका म्हणजे लोकशाही नव्हे तर ते विना आत्म्याचे शरीर आहे, त्यात सर्वसामान्य व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा, सर्वांना समान संधीचा, संस्थांच्या स्वायत्तेचा, मोकळ्या अभिव्यक्तीचा आत्मा ओतला नसेल तर लोकशाही सरणावर गेल्याशिवाय राहणार नाही, हे नीट लक्षात घेतले तर अभिव्यक्तीवर वेगवेगळ्या प्रकारे अंकुश आणण्याचे जे प्रयत्न राज्यात होत आहेत त्यांचे गांभीर्य कळू शकेल, सद्य परिस्थितीत विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक निर्भेळ व निष्पक्ष वातावरणात पारदर्शीपणे पार पडावी याची जबाबदारी लोकशाहीच्या चारही स्तंभांसोबत निवडणूक आयोग, सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि मतदार यांच्यावरही आहे, याकरता मतदारांनी गेल्या पाच वर्षातील राज्य सरकारच्या योजना आणि विकास कामांचा लेखाजोखा तपासून सन २०१९ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकी नंतरची राजकीय समीकरणे नेत्यांनी घेतलेल्या भूमिका त्यांची आश्वासने आणि घोषणा यातून सामान्य जनता आणि भांडवलदार व्यापारी ठेकेदार यांची असलेली हिस्सेदारी याचा विचार करून मतदानाचा हक्क बजावावा यासोबत हेही लक्षात घेतले पाहिजे की, एकीकडे सरकारी नोकरीसाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव, भरती परीक्षा, मुलाखती असे निकष लावायचे आणि दुसरीकडे यातील कुठलेही निकष न लावता राजकीय घराणेशाहीच्या नावाखाली आजोबापासून ते नातवापर्यंत निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी म्हणून आयुष्यभराची पेन्शन आणि विकास कामावरील टक्केवारी, सरकारी कर्मचारी यांची बदली, पदोन्नती त्याकरता मलाई खायची तजवीज करायची तसेच निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीला पगार म्हणून अंदाजे दोन लाख तेरा हजार एवढी रक्कम महिन्याला सरकारकडून देण्यात येते आणि फक्त पाचवर्षाच्या सेवेच्या कालावधीनंतरच या रकमेच्या बेसिक रक्कम अंदाजे १ लाख १३ हजार यावर जुनीपेन्शन नुसार पुढील आयुष्यभरासाठी पेन्शन सुरू करण्यात येते, परत दुसऱ्यांदा निवडून आल्यानंतर मागील बेसिक पगारामध्ये वाढ करण्यात येते त्यानुसार पेन्शन रकमेत सुद्धावाढ होते. अशा दर पाच वर्षांनी निवडून येणाऱ्या उमेदवारांच्या मालमत्तेमध्ये जनसामान्य आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या रकमेच्या कित्येक शेकडोपटीने वाढ झालेली दिसते, याचा सुज्ञ नागरिकांनी विचार करून जनसामान्यांसाठी असा शुभ मुहूर्त हा पाच वर्षातून एकदाच येतो,यासाठी राज्यातील काही घटनांचे विश्लेषण गरजेचे आहे.

गेल्या पाच वर्षातील राज्याचे राजकारण पाहिले तर महत्वकांक्षी राजकारण आणि सत्तेसाठी प्रादेशिक पक्षातील तोडफोड, केंद्राकडून स्वायत्त संस्थांचा वापर आणि विरोधी पक्षातील नेत्यांना केलेली अटक या घटना तसेच राज्यातील तोडाफोडीनंतरच्या अस्तित्वात असलेल्या सरकारकडून ठराविक उद्योगपतींना सरकारी क्षेत्रातील बांधकाम, खरेदी, सेवा म्हणजे पायाभूत सुविधा अथवा विकासाच्या नावाने अथवा झोपडपट्टी पुनर्वसन या पोटी नियम डावलून भूखंड आणि जास्त दराने मान्य केलेल्या निविदा यासोबतच वीज खरेदी, विशेष म्हणजे केंद्राने सुद्धा एकाही भांडवलदार उद्योगपतीने कर्जमाफी अथवा करमाफी याकरिता मोर्चा आंदोलन केले नाही तरीसुद्धा त्यांचे कित्येक लाखो कोटींचे कर्ज माफ करून त्यांना सरकारी ठेके आणि शासकीय संस्थांच्या खाजगीकरणांतून लाभ दिला, दुसरीकडे आंदोलने मोर्चे करूनही शेतकऱ्यांना हमीभाव, बेरोजगारांना पारदर्शक सरकारी नोकरी, शाश्वत रोजगार, व्यवसाय निर्मिती अटक या घटना तसेच राज्यातील तोडाफोडीनंतरच्या अस्तित्वात असलेल्या सरकारकडून ठराविक उद्योगपतींना सरकारी क्षेत्रातील बांधकाम, खरेदी, सेवा म्हणजे पायाभूत सुविधा अथवा विकासाच्या नावाने अथवा झोपडपट्टी पुनर्वसन या पोटी नियम डावलून भूखंड आणि जास्त दराने मान्य केलेल्या निविदा यासोबतच वीज खरेदी, विशेष म्हणजे केंद्राने सुद्धा एकाही भांडवलदार उद्योगपतीने कर्जमाफी अथवा करमाफी याकरिता मोर्चा आंदोलन केले नाही तरीसुद्धा त्यांचे कित्येक लाखो कोटींचे कर्ज माफ करून त्यांना सरकारी ठेके आणि शासकीय संस्थांच्या खाजगीकरणांतून लाभ दिला, दुसरीकडे आंदोलने मोर्चे करूनही शेतकऱ्यांना हमीभाव, बेरोजगारांना पारदर्शक सरकारी नोकरी, शाश्वत रोजगार, व्यवसाय निर्मिती यावर ठोस निर्णय झाले नाहीत, जनसामान्यांच्या दरडोई उत्पन्न वाढी करता कुठलीही शाश्वत उपायोजना न करता, गरिबीचा झोला पांघरून कल्याणकारी योजनांच्या नावाखाली फक्त मोफत रेशन, घरे, गॅस सिलेंडर अशा सरकारी योजनेवर जगणारा लाभार्थींचा मोठा समुदाय अवलंबून कसा राहील याचीच तरतूद केली? आधीच्या निवडणूक काळातील जाहीरनाम्यातून आत्मनिर्भर भारत, शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न, दोन कोटी रोजगार आणि काळ्या पैशाची घोषणा या वास्तवात आल्या असत्या तर गरीबांसाठी फुकट रेशन, बेरोजगारी भत्ता, शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदत,महिला सुरक्षिततेसाठी योग्य यंत्रणा उभारण्याऐवजी त्यांना एसटीमधून मोफत प्रवासाची आणि २१००/ तीन हजार रुपये प्रति महिना अशी प्रलोभने आणि कोट्यावधी जनतेला अनुदानांच्या लाभार्थी योजनेवर अवलंबून राहण्याची गरज पडली नसती, जनतेने फुकटच्या गोष्टींपेक्षा प्रगतीचे आणि समतेचे धोरण मागावे, ज्यामधून त्यांना त्यांच्या कष्टाचे योग्य मूल्य मिळेल.

अशा भव्य प्रचारसभातून आणि जाहीरनाम्यातून दिलेली आश्वासने ही फक्त कागदावर छापलेली बोल्ड शब्द यापलीकडे यात वास्तवाची काहीच कसोटी नसते, अमलबजावणीची फक्त कल्पनाच असून पाच वर्षात त्यांना आपले उत्पन्न शेकडोपटीत वाढवायचे असते यावरून पुढील प्रश्न पडतात सामान्य मतदारांसाठी लोकशाही एक दूरची गोष्ट बनत चालली आहे का? धनदांडग्यांचा प्रभाव असलेल्या निवडणुकीत सामान्यांचा आवाज कुठेतरी हरवत आहे का? यामुळे भविष्यात निवडणुकांमध्ये जनसामान्यांचा आवाज खऱ्या अर्थाने कसा ऐकू येईल?

# अग्रलेख....

## न्यायव्यवस्थेचे वर्तुळः एक चिंतन

**भारताच्या** न्यायव्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिली तर, पूर्वीच्या काळात न्यायदानाची पद्धत लोक राजाकडे जाणे, त्याच्या दरबारात न्याय निवडणे यावर आधारित होती. त्या काळात प्रत्येक जातीमध्ये जातीय समित्या कार्यरत होत्या, ज्या त्यांच्या समाजाने न्याय निवडण्यासाठी स्थापन केल्या होत्या. यामुळे उच्चवर्णीय लोकांचा न्यायव्यवस्थेवर वर्चस्व होता, ज्यामुळे अच्युत आणि स्पृश्य अस्पृश्यतेसारखे भेद न्यायदानात भासत होते.

स्वातंत्र्यानंतर, भारताने संविधानाचा अवलंब केला आणि न्यायालयांचा अस्तित्वात आला, जो एक निष्पक्ष आणि सर्वसमावेशक न्यायदान प्रक्रिया ठरवला गेला. परंतु, सध्याच्या परिस्थितीत न्यायालयांमधील प्रलंबित केसेस आणि न्याय देण्यात विलंब तसेच न्यायाधीशांची कमतरता हे चिंता उत्पन्न करणारे आहेत.

पूर्वी Justice is blind असे उपहासाने म्हणले जायचे परंतु सध्या डोळ्यावर पट्टी बांधलेल्या न्यायदेवते ऐवजी हातात संविधान धारण केलेली डोळ्यावर पट्टी नसलेली आणि साडी धारी लेडीज जस्टीस ची सहा फुटी मूर्ती बसवण्यात आली हे ही स्वागतार्हच म्हणावं लागेल!, परंतु वकीलांची उच्च फी त्यांचे संगनमत आणि न्यायाधीशांच्या हातात न्यायाच्या तारखा न्यायालयीन खर्च, आणि न्यायप्रणालीतील विविध घटक यामुळे न्यायप्राप्तीचे आर्थिक परिमाण वाढले असून गरिबांसाठी न्याय महाग होत चालला आहे का? आणि श्रीमंतांना उच्च दर्जाचे भरमसाठ फी घेणारे वकील, जलद प्रक्रिया, न्यायिक प्रकरणांना प्राधान्य अग्रक्रम, थोडक्यात श्रीमंत व्यक्तीला योग्य न्याय मिळवण्यासाठी आणि तो वेळेत प्राप्त करण्यासाठी उच्च दर्जाचे वकील, जलद न्यायालयीन प्रक्रिया, आणि प्राधान्य मिळते. याउलट, सामान्य व्यक्तीला कमी दर्जाचे वकील, विलंबित न्यायप्रणाली, आणि आर्थिक अडचणी यांचा सामना करावा लागतो, असे वाटते.

तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या कार्यकाळातील सर्वोच्च न्यायालयाने भूमी अधिग्रहण कायद्यात बदल करून, खासगी मालमत्ता सामायिक स्त्रोत नाहीत आणि सार्वजनिक कामांसाठी सरकारला या मालमत्ता ताब्यात घेता येणार नाही, असा नर्णय दिला. हा निर्णय सामान्य नागरिकांच्या मालमत्तेच्या हक्कांच्या दृष्टीने स्वागतार्ह असून सोबतच सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या कार्यकाळात निवडणूक रोखे योजना बेकायदेशीर ठरवून रद्द करण्यात आली, त्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि भांडवलशाही व राजकीय पक्ष यांच्या अवैध युतीला आळा बसला, जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय वैध ठरविण्यात आला हे सर्व निर्णय निःसंदिग्धपणे स्वागतार्ह ठरले, परंतु त्यांच्या काही वक्तव्यांमुळे न्यायव्यवस्थेच्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. या विषयावर समाजात चर्चा होणे आणि कायदे-व्यवस्थेच्या निष्पक्षतेचे समर्थन करणे अत्यंत आवश्यक आहे, जसे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी एका कार्यक्रमात राम मंदिर खटल्यासंबंधी असे म्हटले की, भगवान श्रीराम यांच्याकडे मार्गदर्शन मागितले होते.

एक सामान्य व्यक्ती म्हणून आव्हानात्मक परिस्थितीत कोणत्याही देवाकडे प्रार्थना करणे हे मानवतेच्या दृष्टीने योग्य मानले जाऊ शकते, परंतु न्यायव्यवस्थेतील धर्मनिरपेक्षता आणि निष्पक्षतेच्या दृष्टीने हे वक्तव्य विवादास्पद ठरते. धार्मिक श्रद्धेचा आधार घेऊन निर्णय घेण्याच्या या टिप्पणीमुळे समाजात प्रश्न उपस्थित झाले की, न्याय व्यवस्थेचा पाया संविधान आणि कायद्यावर आधारित असावा की धार्मिक श्रद्धांवर? सामान्य नागरिक कायद्यापासून न्याय, सुरक्षा आणि स्वातंत्र्याची अपेक्षा करतात. परंतु, न्याय प्रक्रियेत धार्मिक श्रद्धांचा उल्लेख किंवा आधार घेतल्यास समाजात अन्यायाच्या भावना आणि असुरक्षितता निर्माण होऊ शकते.कोण करील सो राम रचि राखा! या धारणेनुसार निर्णय घेऊन नंतर धर्माच्या आधारे त्याचे समर्थन करण्याचा धोका भविष्यात निर्माण होऊ शकतो? असे प्रश्न पडतात.

भारतीय लोकशाहीतील सर्वधर्मीयता, भाषिक विविधता आणि जातींचा समावेश हे तिच्या समृद्धतेचे प्रतीक आहे. न्यायव्यवस्थेने या विविधतेला नेहमीच आधार दिला असून, सर्वांना समान न्याय देण्याची जबाबदारी पार पाडली आहे, यानंतरही न्यायालयांनी भारतीय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचा विचार करून त्यांच्या निर्णयात विविधतेला आदर देत, एक सुसंस्कृत आणि तटस्थ न्यायव्यवस्था स्थापन करणे आवश्यक आहे, ज्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकाला न्याय मिळण्याची गॅरंटी दिली जाईल.*****

# ॥श्रद्धेचा बाजार ॥



आयोध्येतील राम माझ्या स्वप्नात अवतरले पाहूनी निवडणुकीतील
धर्माचा आणि श्रद्धेचा बाजार मन रामाचे झुरले,
राजकीय स्वार्थापोटी मंदिर पूर्ण नाही तरी गळक्या मंदिरात मला इथे का बसवले?
राम-रहीम आणि साई-राम यातून यांनी स्वहितासाठी रामाला का वेगळे केले,
स्त्री सन्मान-अहंकार-अधर्म-प्रजेवरील अन्याय-अत्याचार यासाठी मी
रावणाला मारले, आयुष्यभर न्याय-धर्म-मानवता याला आपले व्रत मानले,
परंतु माझ्याच मंदिरातील सेविकेवर अत्याचार केलेल्या कलियुगातील
रावण असलेल्या नराधमांनी आता मलाच घेरले,
जय श्रीराम नाम घोष हे तर भक्ती प्रेम एकात्मता सात्विकतेचे प्रतिक होते यालाच
यांनी सामाजिक धार्मिक द्वेष सहिष्णुतेचे हतियार बनवले,
न्यायाचे प्रजेचे शासक म्हनवणाऱ्यांनी मलाच स्मरणात ठेवून भेदाभेदाचे निर्णय
दिल्याचे बोलू लागले, मी म्हणतो खरे रामराज्य यांना कधीच नाही उमगले!
श्रीराम म्हणाले निवडणूक काळात आपल्या प्रभागातील लोकांसाठी सहली
यात्रा काढून यांनी मंदिराला केवळ स्वतःच्या प्रचाराचे डेस्टिनेशन बनवले,
यातच मंदिरा बाहेरील रांगेमध्ये राम परम निष्ठावान भक्तांना शोधू लागले,
पुढे पाहुनी रांगेत उभे सत्तापीपासू धर्मांध, नराधम महिला अत्याचारी मर्यादा
पुरुषोत्तम राम व्यतीत झाले आणि म्हणाले माझे अतुट निष्ठा,
निस्वार्थ सेवा, निस्सीम भक्ती करणारे खरे भक्त कुठे राहिले?
मी म्हणालो देवा खरे भक्त चाली ऊन पावसात, जाती- धर्म विसरूनी
एका वाटेनी एका ध्येयानीं जय सियाराम या नाम ऊर्जेनी अंतर कापून
तुझ्या मंदिरी आले साकडे मांडताना महामहीम येणार म्हणून अंधभक्तांनी त्यांना
बाजूला सारीले, हे ऐकून रामाने धनुष्य खांद्यावर चढवले!
मी म्हणालो देवा रोजच नवीन धर्म आणि नवीन धंदा तुझ्या नावाने
नवीन कायदा, कुठे लागे दोरा, कुठे लागे कुलूप, यात दुकानदारांचा धंदा
खूप, कुठे कंदुरी, कुठे बळी, यात देवा तुलाही वाटून घेतले, माणुसकी
धर्म आणि प्राणीमात्रातील देव विसरूनी देवावरच घातला घाला यातून नेत्यांनी
धर्माचा आणि श्रद्धेचा बाजार मांडला मग सांगा देव कुणास कुठे पावला?
यावर श्रीराम म्हणाले माझ्या नावाने निवडणुकीच्या बाजारात धर्माचे
दुकान कुणी थाटले? आता परत वनवासाला गेलेलेच बरे...तदनंतर मला
झोपेतून जाग आली समोरील पेपर उघडून पाहू लागलो बटेंगे तो कटेंगे
अशा बातम्यांतून धर्माच्या नावानं निवडणुकीचा खेळ सजला होता,
धर्माच्या बाजारात श्रद्धेचा सौदा मांडलेला पाहून अंतःकरण हलले आणि मनोमन
म्हणलो निवडणुकीच्या बाजारात धर्माचे दुकान यांनीच थाटले!

## मनोरंजन विश्व

## राजकीय बोधकथा

एका प्रसिद्ध राजकीय नेत्याचा दौरा गावात ठरला होता. गावातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह ओसंडून वाहत होता. नेत्याचा आगमनसोहळा कसा धडाकेबाज होईल याची कार्यकर्त्यांनी जय्यत तयारी केली होती. रस्त्याच्या कडेने फुलांचे हार, स्वागतासाठी लोकांची गर्दी आणि ढोल-ताशांचा गजर चालू होता.

नेता गावात पोचला, आणि त्याच क्षणी दोन-तीन कुत्री लांबून त्याच्याकडे भुंकत जवळ येऊ लागली. कार्यकर्त्यांनी घाबरून कुत्र्यांना दूर हाकलण्यासाठी दगड हातात घेतले. पण त्याक्षणी नेत्याने कार्यकर्त्यांना थांबवत, शांतपणे त्यांना म्हणाले, अरे, शांत बसा. आता मजा बघा. त्याने हसत कार्यकर्त्याला काही बिस्किटांचे पुडे आणायला सांगितले.

नेत्याने हळूहळू त्या कुत्र्यांकडे बिस्किटे टाकायला सुरुवात केली. कुत्री दूरूनच बिस्किटांकडे बघत होती, पण हळूहळू ते नेत्याच्या जवळ येऊ लागले. बिस्किटांचा स्वाद घेत शेपटी हलवू लागली. काही क्षणांतच ती कुत्री नेत्याच्या पायापर्यंत आली, आणि तो नेता त्यांच्यावर प्रेमाचे दाखवू लागला. परंतु, काही वेळाने त्या नेत्याने त्याच कुत्र्यांना जोरदार हाड म्हणून लाथ मारली, आणि ती कुत्री शेपटी घालून दूर पळाली.

असे राजकारणी सध्या राजकीय परिस्थितीत कार्यकर्ते, पत्रकार आणि सुज्ञ मतदार नागरिक यांनी आता कुत्र कोण याचे उत्तर शोधावे ? आता निवडणुकांचे बिगुल वाजणार असून जनतेने राजकारण्यांच्या वागणुकीचा अभ्यास करून त्यांना मतदानाच्या रूपाने मार्क द्यावेत ज्या राजकारणी नेत्याने व्यवस्थित काम केले नसेल तर त्याला नापास करावे यासाठी काही पॅरामिटर ठरवावे जसे आपल्याला नोकरीसाठी, अनुदानासाठी, कर्जासाठी, व्यवसायासाठी निरनिराळ्या अटी आणि शैक्षणिक पात्रता यांचे निकष लावले जातात तसेच निकष येथून पुढे सर्वांनी स्वतःसाठी लावून राजकारणी मंडळींना निवडून द्यावे बघा जमतय का ?

## सत्तेची नशा खूप भारी, तिजोरी रिती आणि खिसा भारी !

**सद्यस्थितीतील** जनसामान्यांसाठी च्या योजना आणि शाश्वत विकास कामे अथवा मराठा आरक्षण आणि ओबीसी मधील वाद यावरील उपाय योजना बघता गोष्टीतील माकडाची आठवण होते, जसे गोष्टीतील काळ्या आणि पांढऱ्या मांजरींना भेटलेल्या केकचा समसमान वाटा करण्याची जबाबदारी माकडाची असते परंतु माकडाला वास्तविक समसमान वाटा द्यायचाच नसतो, जेणेकरून प्रत्येक वेळी तो कुणाच्यातरी ताटात कमी अथवा जास्त टाकत राहतो, जेणेकरून दोन मांजरी मध्ये भांडण होत राहावे आणि याचा फायदा माकड स्वतः केक खाऊन घेत राहतो, उलट पक्षी मांजरींना तुम्हाला समसमान न्याय देण्यासाठी मी किती खटाटोप करत आहे असे भासवतो, शेवटी माकड राहिलेला छोटासा केक दोन्ही मांजरींना पुरविलेल्या सेवांचा कर म्हणून स्वतः खाऊन टाकतो बघता बघता पूर्ण केक फस्त होतो आणि दोन्ही मांजरींची ताट रिकामीच राहतात, आता जर सुज्ञ नागरिकांना गोष्टीतील माकड, मांजर आणि केक यामध्ये नागरिकांना सरकारकडून अपेक्षित सर्वांगीण शाश्वत विकास, शाश्वत रोजगार, शाश्वत शैक्षणिक आणि आरोग्य सुविधा, महागाईवर उपाययोजना याविषयी कामे न होता, राजकारण्यांकडून धार्मिक ध्रुवीकरण, जातीय तेढ, आणि निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यावर कर्जाचा बोजा वाढवून तिजोरी रीती करण्याच्या योजना तसेच योजनेच्या माध्यमातून आशावादी जनतेच्या हाती गाजर देऊन, जीएसटी आणि इतर करांची वसुली करून, याचा मोबदला अर्थात गाजराचा हलवा मात्र आपल्या हितसंबंधित ठेकेदार आणि उद्योगपतींना देऊन, मिळणाऱ्या दलालीतून स्वतःचे खीसे भरून जनतेला मात्र मदतीचा आव दाखवून स्वतःचीच पाठ थोपटून घेणारी राज्यकर्त्यांची भूमिका दिसत असेल तर तो निव्वळ गोष्टीचा आणि सद्य सामाजिक परिस्थितीचा योगायोगच म्हणावा लागेल.

## सत्यउपासक कविता

*स्मशाने दिन रात मोफत खुली*

ही दुनिया नाही भली सत्तेसाठी ह्यांनी लोकशाहीची वाट लावली,
जात, धर्म, आरक्षण याच्यात लढवून पैशाने भरल्या ह्यांनी तळघरातील खोली, गरिबांच्या घरातील मात्र विझल्या चुली;
गोरगरीब शेतकऱ्यांचे मरण झाले आता मामुली, यासाठी सरकारची नवी योजना स्मशाने आता दिन-रात मोफत खुली;
हात जोडून विनंती आपणास नका लावून देऊ परत आपल्या मतांची बोली...

॥ हुकूमशाहीला सरणावरती उलटे टाका ॥

ऐका पुढील हाका, हा प्रसंग आहे बाका, लोकशाही मोजत आहे शेवटच्या घटका;
दोन कोटी रोजगार, शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न ह्या फक्त त्यांच्या फेका;
सत्तेसाठी स्व पक्षावरच घातला ह्यांनी डाका;
छत्रपतींच्या पडुनी पाया मराठ्यांना दिला धोका,
स्पर्धा परीक्षेच्या फी तून युवा बेरोजगारांना ही लावला करोडोचा बुका;
स्वतःचे अपयश झाकून फक्त विरोधकांवर केल्या ह्यांनी टीका,
मतांच्या मागतील परत आता भिका, आलेल्या अनुभवातून आता तरी शिका;
परत करू नका त्याच त्याच चुका, चालवा आपला डोका,
भ्रष्टाचाऱ्यांना देऊ नका पुढे मोका;
संविधान वाचवण्यासाठी आता द्या मताचा शिक्का, परत म्हणतो हा प्रसंग आहे बाका, आता हुकुमशाहीला सरणावरती उलटे टाका.

"SATYAUPASAK" is a Weekly Marathi by the Publisher, Owner, Printer, **DIPALI ATISH SALUNKE** Printed at Pruthvi Enterprises, 113 Mahatma Pule peth pune - 411042 and published at **Sr.No. 746 Guruwar Peth, Near Rashtrabhushan chowk, Swargate, Pune City, Pune- 411042**
**Name of Editor - ATISH NARENDRA SALUNKE (responsible for editorial content as per PRB Act.1867) *newspaperLegal cases will be settled in pune Court.**

"**सत्यउपासक**" हे मराठी साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक, दिपाली अतिश साळुंके यांनी पृथ्वी इंटरप्रायजेस, ११३ महात्मा फुले पेठ, पुणे ४११०४२ येथे छापून, ७४६ गुरूवार पेठ, राष्ट्रभूषण चौक जवळ, स्वारगेट, पुणे शहर, पुणे -४११०४२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक - अतिश नरेंद्र साळुंके** ( पीआरबी कायदा १८६७ नुसार संपादक **अतिश नरेंद्र साळुंके** जबाबदार राहतील.) (या साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
* सर्व वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. E-mail - satyaupasak@gmail.com मोबाईल क्रमांक -9881665110

# चक्रव्यूहातील युवा वर्ग!

**भारताची** लोकसंख्या साधारण १४५ कोटी एवढी असून, यामध्ये १८ ते ३५ वयोगटातील युवकांचे प्रमाण साधारण ५०% पेक्षाही अधिक आहे, या युवा शक्तीचा सकारात्मक वापर राष्ट्राच्या उन्नतीसाठी केला तर फक्त लोकसंख्येच्या बाबतीतच नाही तर अर्थव्यवस्थेच्या बाबतीतही भारत चीनला मागे टाकू शकेल परंतु सध्या जागतिक क्रमवारीत देशातील बेरोजगारीने सुद्धा अव्वल क्रमांक गाठला आहे ही एक शोकांतिका असून ७० कोटी तरुण रोजगाराच्या शोधात आहे. सरकारी निमसरकारी क्षेत्रे यातील भरती बंद आहेत, जाहिराती, परीक्षा, आणी मुलाखती या सगळ्या फार्स ठरत आहेत. फॉर्म फी, च्या नांवाने कोटींच्या रकमा गोळा करून व्यवस्थेचे मालक पिढ्यानं पिढ्या लुटत आहेत. भोळ्या आशेवर जगणारी तरुणाई मात्र कफल्लक होत चालल्लीय याला जबाबदार कोण? हा महत्त्वाचा विषय असून यावर उपाय म्हणून सद्य परिस्थितीत सरकारकडून उचललेली पावले म्हणजे भीक नको पण कुत्रा आवर! अशा स्वरूपाची म्हणावी लागतील?

विविध राजकीय पक्षांनी सध्याच्या जाहीरनाम्यांमध्ये रोजगार निर्मितीवर मोठा भर दिला आहे. त्यात बेरोजगार भत्त्याचे आश्वासन तर आहेच परंतु ही फक्त निवडणुकीतील मतांसाठी चालवलेली एक प्रकारची खेळी असून बेरोजगार युवकांना भत्ता देणे म्हणजे त्यांच्या क्षमतांचा योग्य वापर न करता त्यांना परावलंबी बनवण्यासारखेच नाही का? बेरोजगारी भत्ता म्हणजे भविष्यात आपल्या जबाबदारीला पळवाट काढत रोजगारनिर्मितीची जबाबदारी टाळणे तर नाही ना? युवकांनी बेरोजगारी भत्त्याच्या फोलपणाला ओळखून राजकीय घोषणा आणि त्यामागील दुटप्पी भूमिका समजून घेणे गरजेचे आहे.

**युवकांचा आजवरचा अनुभव:** राज्यातील सत्ता बदलली की युवकांची बेरोजगारी हटवण्यासाठी नव्याने शासकीय सेवा भरती करण्याच्या घोषणांचा पाऊस पडतो, यातच स्पर्धा परीक्षेतील वयाची अट तेहतीस वर्षे करून त्याला जगण्यास नाउमेद करून सोडून देणं हा प्रकार नियोजनबद्ध सुरु आहे. जर मुलगा अथवा मुलगी वयाच्या वीस ते पंचवीस पर्यंत परिश्रम नाही करू शकला तर तो आयुष्यात कधीच यशस्वी होत नाही, ही जिवंत उदाहरणे आहेत; याचा फायदा खाजगी कोचिंग क्लास वाल्यांनाच होतो, एमपीएससी क्लासेस हा एक मोठा व्यवसाय बनला आहे. सराव परीक्षा, स्पर्धा परीक्षा, मेन परीक्षा, मुलाखतीची तयारी याकरता कोचिंग क्लासेस कडून भरमसाठ लाखो रुपयांची फी आकारली जाते, यातील बहुतेक विद्यार्थी कायमस्वरूपी सरकारी नोकरी मिळावी याकरिता ग्रामीण भागातून आलेले असून त्यांना कोचिंग क्लासेसच्या फी बरोबर राहण्यासाठी, खानावळ आणि लायब्ररी हा व इतर सर्व खर्च आपल्या गरीब कुटुंबातील पालकां कडून प्रसंगी कर्ज काढून सुद्धा घ्यावा लागतो, कोचिंग क्लासेस वाले केवळ विद्यार्थ्यांना आशावादी ठेवून त्यांच्याकडून भरमसाठ फी वसुली करून स्वतःची आर्थिक पोळी भाजण्याचे काम करत असून यासाठी राज्य आणि केंद्र सरकार पोषक वातावरण निर्मित करत आहेत असे वाटते, जसे भरती प्रक्रियेत जाणून बुजून त्रुटी ठेवण्यात येत असून भरती प्रक्रियामध्ये विद्यार्थ्यांची वर्गवारी, आरक्षण, पेपर फुटी अशा व इतर काही ना काही शुल्लक कारणांमुळे फेरपरीक्षा अशा चक्रात युवकांसाठीची भरती प्रक्रिया प्रलंबित ठेवण्यात येत आहे, जेणेकरून परीक्षा दिल्यानंतरही मेरिटमध्ये आलेल्या पात्र उमेदवारांना सुद्धा कामावर रुजू करून घेण्यास विलंब होईल, कोचिंग क्लासेस प्रमाणेच शासनाने सुद्धा प्रत्येक स्तरावर युवकांची आर्थिक लूट करून स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आपल्या आर्थिक कमाईचे उद्दिष्ट गाठायचे धोरण निश्चित केले आहे की काय?, असे वाटते. यातच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांपैकी साधारण शेकडो विद्यार्थ्यांनाच यश प्राप्त होते यातील काही नशीबवान युवकांनाच शासकीय सेवेत विना विलंब रुजू केले जाते. इतर युवकांचे परीक्षेच्या प्रयत्नांमध्ये बरेचसे वय परीक्षा देण्यासाठी आणि त्याची तयारी करण्यासाठी निघून जाते यातून ज्यांना यश प्राप्त होते त्या विद्यार्थ्यांचे करियर बनते परंतु जे विद्यार्थी वयाच्या शेवटच्या टप्प्या पर्यंत परीक्षा देत राहतात तरी त्यांना यश प्राप्त होत नाही, त्यांचे मानसिक खच्चीकरण होते कायम शासकीय नोकरी वरती अवलंबून राहिल्यामुळे इतर कामातील इच्छाशक्ती नष्ट होऊन स्वतःवरील विश्वास गमावून बसतात या सर्व गोष्टींचा शासनाने गंभीर विचार करून विद्यार्थ्यांच्या भविष्याचा धंदा करणाऱ्यां मनोवृत्तीचा नायनाट केला पाहिजे.

**सरकारी योजना आणि त्याची वास्तविकता:** गेल्या दहा वर्षांपासून केंद्र आणि राज्य सरकारांकडून राबविल्या जाणाऱ्या विकास योजनांचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील मोठी बाजारपेठ साधण्यासाठी बँकिंग क्षेत्राला प्रोत्साहन देणे आणि भांडवलदारांचा अप्रत्यक्ष फायदा साधणे, असा दिसून येतो. या योजनांद्वारे गोरगरीब, शेतकरी, महिला, आणि युवावर्गासाठी मदत पुरविण्याचे आश्वासन दिले जात असले, तरी त्यांचा प्रत्यक्ष लाभ अत्यंत मर्यादित असतो. उदाहरणार्थ, युवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी मुद्रा कर्ज योजना अथवा इतर नवउद्योजक व्यावसायिकांना अर्थसहाय्य योजना यात केवळ ३० ते ४० टक्के सबसिडी दिली जाते. उर्वरित भांडवलासाठी बँकांकडून कर्ज घेतले जाते, ज्यात बँकेच्या व्याजाचा बोजा आणि जीएसटीसारख्या करांचा भार हा तरुण उद्योजकांवर येतो. २० लाख रुपयांचे भांडवल धरून व्यवसाय सुरू करायचा झाल्यास, बांधकाम, यंत्रसामग्री, कच्चा माल, भाडे, वीज बिल, कामगारांचे पगार, आणि बँकेचा हप्ता यासारखे खर्च आधीच तयार होतात. या सगळयात जीएसटी १२–१८% धरला तर व्यवसाय सुरू होण्याआधीच २८% रक्कम खर्च होते. या कोंडीमध्ये मोठ्या भांडवलदारांशी होणारी स्पर्धा, जाहिरात खर्च, बँकेचा व्याजदर आणि इतर अनावश्यक खर्च तरुणांच्या प्रगतीला रोखतात. अशा योजनांमुळे ग्रामीण भागात बँकेचे ग्राहक वाढवण्याचे उद्दिष्ट पूर्ण होते, परंतु प्रत्यक्षात तरुणांना, शेतकऱ्यांना किंवा इतर लाभार्थ्यांना काहीच ठोस फायदा होत नाही. उलट, या योजना फक्त भांडवलदार आणि बँकिंग क्षेत्रासाठीच लाभदायक ठरतात. याचा परिणाम म्हणजे, सामान्य लोकांच्या जमिनी तुटपुंज्या मोबदल्यात विकासाच्या नावाखाली घेतल्या जातात, आणि सरकारी ठेके राजकीय हितसंबंध असलेल्या कंपन्यांना दिले जातात. शाश्वत योजना न राबवता, अशा क्लिष्ट योजनांच्या माध्यमातून सामान्य नागरिकांच्या आर्थिक प्रगतीला अडथळा निर्माण होतो आणि त्याच वेळी भांडवलदारांच्या हिताचे संरक्षण होते.

**युवकांची व्यथा:** लाखो रुपये शिक्षणावर खर्च करून नोकरीच्या शोधात असलेलां युवा वर्ग रोजगाराच्या संधी नसल्याने हताशा आणि निराशेने ग्रस्त असून प्रत्येक निवडणुकीपूर्वी नवीन आश्र्वासनं आणि कार्यक्रमांचे घोंगडे उभे केले जाते, मात्र त्यांच्या मूळ उद्दिष्टापर्यंत पोहोचणारे फार कमी असतात शासन 'आपल्या दारी'च्या माध्यमातून रोजगार मेळावे घेत आहे. मात्र, रोजगार देणाऱ्या कंपन्या आणि विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शिक्षण क्षेत्रामध्ये ताळमेळ नसल्याने कौशल्याधारित रोजगाराला हरताळ फासला जात आहे.

**प्रशिक्षणाचे खेळ आणि फायदा फक्त कंपन्यांचा:** निवडणुकीच्या तोंडावर राजकीय स्वार्थापोटी शासकीय खर्चाने पुरस्कृत रोजगार मेळावे घेण्यात येत आले, यामध्ये रोजगार देण्यासाठी येणाऱ्या कंपन्या आणि विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतलेले क्षेत्र यामध्ये ताळमेळ नसून स्किल्ड एम्प्लॉयमेंटला हरताळ फासण्यात येत आहे, स्किल इंडिया, रोजगार मेळावे किंवा ऑन–जॉब ट्रेनिंग सारख्या उपक्रमांना सरकारी निधी दिला जातो, ज्यामुळे कंपन्यांना अनुदान मिळते, परंतु प्रशिक्षित युवकांना कायमस्वरूपी आणि स्थिर रोजगाराची हमी दिली जात नाही. या उपक्रमांतून प्रायोगिक तत्त्वावर रोजगार देऊन युवकांचा उपयोग करून घेतला जातो, आणि लगेचच त्यांना मुक्त केले जाते. परिणामी, कंपन्यांना अनुदानातून फायदा मिळतो, पण त्याचवेळी युवकांना आर्थिक सुरक्षितता व स्थैर्याच्या नावाखाली फक्त तात्पुरता फायदा मिळतो. या खेळात, युवकांच्या ताटात शाश्र्वत रोजगाराच्या अपेक्षेच्या ऐवजी अस्थिरता आणि फसवणूकच वाढते.

**युवकांची राजकीय लाचारी:** काही युवक जीवन जगण्यासाठी कुठल्याही स्तराला जाऊन पैसे कमावण्याच्या प्रयत्नात असतात, याच मानसिकतेचा फायदा घेऊन युवा पिढीचा वापर गुन्हेगार आणि राजकीय मंडळीकडून स्वतःच्या अजेंडासाठी केला जातो, याची वाटचाल सुरू होते ती दादागिरी, धटिंगिरी, आणी हाणामारी. हे ज्याला पाहिजे असतं तो पुढारी, त्यांचे हे गुलाम कम सेवेकरी.! बेंजो, लेझीम, झांज पथक, ढोल ताशा चे मानकरी म्हणून ही पथके तयार होताना दिसत आहेत, रोजगार नाही, उत्पन्न नाही, राबून कष्टाने जगण्याची हिम्मत संपलेले जीव दुसरं काय करणार? यावर विचार करून युवकांनी कायमस्वरूपी राजकीय गुलामी करून नुसत्या धार्मिक दंगलीच करायच्या का; पिढ्यानं पिढ्या बसून खातील असा गल्ला विदेशात ठेऊन देशात धिंगाणा चालू ठेवणाऱ्या नेत्यांना सहन करायचं हे ठरवावं लागेल.!

**उद्योगजगतातील चक्रव्यूह:** युवकांचा जास्तीत जास्त वेळ मोबाईल आणि सोशल मीडिया यामध्येच जात आहे, याचाच फायदा घेऊन काही उद्योगपती युवकांसाठी नवनविन मोबाईल गेमिंग प्स, जसे रमी कॅश गेम, जंगली रमी, –२३ रमी, रमी सर्कल, रमी पॅलेस, याचबरोबर ऑनलाईन बेटिंग प्स आणून या प्स च्या जाहिरातीत फिल्मस्टार क्रिकेटपटू यांचा वापर प्रचारक म्हणून करून जाहिरातींच्या माध्यमातून अशा प्रकारच्या सट्टेबाज गेमिंग प्सच्या खेळातून काही दिवसातच लाखो रुपयांची कमाई होऊ शकते, असे युवकांना पटवत आहेत. सुरुवातीला या पच्या माध्यमातून युवकांना काही प्रमाणात कमाई होते, अशा प्रकारे त्यांना आकर्षित करून कालांतराने त्यांना ऑनलाइन गेमिंगचे व्यसन जडते, यातून दिवस–रात्र वेळ काळ न बघता पैसे लावून खेळ खेळण्यात ते व्यस्त होतात हळूहळू सट्ट्याची रक्कम वाढत जाते आणि जिंकण्याचे प्रमाण कमी आणि हरण्याचे प्रमाण जास्त होत जाते. मुळात ह्या गेम्स पूर्णतः कम्प्युटरराईज असून डेव्हलपर ने अशा पद्धतीने प्रोग्रामिंग केलेल्या असतात जेणेकरून दहा गेम खेळल्यानंतर दोन ते तीन वेळाच जिंकवले जाते, किंवा जिंकायच्या वेळेस इंटरनेट नेटवर्क कनेक्शन कमी होते, बँकेतुन पैसे कट झाले तरी गेम वॉलेटमध्ये ते जमा होत नाहीत, इंटरनेट सर्वर डाऊन अशा कारणाने सुद्धा पैसे बुडले जातात, जिंकलेले पैसे बँक अकाउंट मध्ये घेण्यासाठी कित्येक वेळा केवायसी केली तरी मोघम तांत्रिक अडचणी सांगून पैसे देण्यास टाळाटाळ केली जाते, काही प्रसंगी परस्पर गेम आयडी डेव्हलपर कडून ब्लॉक केला जातो. सध्याच्या स्पर्धेच्या युगात युवकांची मानसिकता ही आनंददायी आणि ऐशोआरामाचे जीवन जगण्यासाठी कुठल्याही स्तराला जाऊन पैसे कमावण्याची दिसून येत आहे, याच मानसिकतेचा फायदा घेऊन युवा पिढीची काही जणांकडून अर्थिक फसवणुक केली जात आहे, युवकांना एका रात्रीत करोडपती बनायची स्वप्न दाखवून काही उद्योग आणि गुन्हेगार जगतातील मंडळी त्यांची राजरोसपणे आर्थिक लूट करत असून युवकांनी वेळीच या लुटारुंपासून सावध राहून त्यांच्या भूलथापांना बळी पडू नये.

**अर्थनीतीचे चक्रव्यूह:** सामान्य जनता आणि कर्मचारी वर्ग कलियुगातील आर्थिक चक्रव्ह्युहात फसला असून यातून युवा वर्ग सुद्धा सुटलेला नाही, पूर्वीच्या सावकारांची जागा आता बँकांनी घेतली असून युवकांना सुरुवातीला क्रेडिट कार्डच्या माध्यमातून या जाळ्यात ओढले जात असून अडीअडचणीच्या प्रसंगी खात्यामध्ये पैसे नसताना सुद्धा क्रेडिट कार्ड वरील रक्कम तुम्ही वापरू शकता असे सांगून नंतर मोबाईलवर गिफ्ट वाउचर, डिस्काउंट, निरनिराळ्या खरेदीच्या योजना असे मेसेज पाठवून आमिष दाखवून तरुणांना अनावश्यक खर्च करण्यास भाग पाडले जाते, परिणामी खऱ्या आर्थिक अडचणी प्रसंगी तरुणांच्या क्रेडिट कार्डवर शिल्लक रक्कम नसल्यामुळे ऐन वेळेस त्यांना पर्सनल लोन च्या नावाने परत एकदा जाळ्यात अडकवले जाते, यापुढे एकीकडे हाउसिंग लोन, लाईफ स्टाईल, फॉरेन टूर, यांच्या माध्यमातून कमवता तरुण कर्ज रुपी हप्त्यात कसा अडकला जाईल याची दक्षता बँकेंकडून घेतली जात असून सामान्य जनता आणि युवकांचे पुढील पूर्ण आयुष्य कर्जाचे हप्ते भरण्यात कसे व्यर्थ होतील, आणि दुसरीकडे मोठमोठे उद्योगपती व्यवसायिक यांना कमी व्याजदरामध्ये हजारो कोटींचे भांडवली कर्ज देऊन त्यांना सरकारकडून सवलती दिल्या जात असून ही झालेली तूट भरून काढण्यासाठी सामान्य कर्जदारांवर अतिरिक्त बोजा पडत आहे, तसेच म्युच्युअल फंड, शेअर बाजार, बँकिंग सेक्टर, अशा ठिकाणी ठेव स्वरूपात सामान्यांनी जमा केलेला पैसा फंड मॅनेजर, बँक मॅनेजर, शेअर ब्रोकर परत फिरून अशा उद्योगपतींच्या कंपनीतच कर्जरूपी आणि गुंतवणुकी च्या स्वरूपात जमा करतात, थोडक्यात सरकारचे काम कॉर्पोरेटच्या धर्तीवर चाललेले दिसत असून जनतेच्या पदरी अंतिम ध्येय आर्थिक गुलामगिरी आहे की काय?. तसेच मागील दहा वर्षातील कालखंडाचे राजकीय आणि औद्योगिक क्षेत्राचे निरीक्षण केल्यास परदेश दौरे, विकास कामे यातून जनतेच्या पोटापाण्याचे किती प्रश्र्न सुटले? देशावर असलेले आंतरराष्ट्रीय कर्ज किती कमी झाले? किसान बिल यातून कोणाला फायदा होणार होता? शासकीय संस्था, विमानतळ, बंदरे यांच्या खाजगीकरणातून कोणाला फायदा झाला? ९०% जनतेचा पैसा फिरून १०% टक्के भांडवलदारांच्या खिशातच जात आहे का? अशा आर्थिक साखळीमुळे आर्थिक विषमता दिवसेंदिवस वाढत असून याचे दुष्परिणाम येणाऱ्या काळात दिसतील श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत जाईल, अर्थातच साल २०२५ पर्यंतचे पाच ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे सरकारचे स्वप्न वाफ होते की काय? हे स्वप्न केवळ शोषिताला अधिक शोषित करून साध्य होणार बेरोजगारी भत्ता देण्याऐवजी सरकारने उद्योगधंद्यांना पोषक वातावरण उपलब्ध करून देणे, जीएसटी व करप्रणालीत सुधारणा करणे, तसेच महागाई नियंत्रणात आणणे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कारण उद्योगधंदे स्थलांतरित होऊ लागले की, रोजगार संधी कमी होतात. परंतु सरकार यासाठी ठोस योजना आणण्याऐवजी भत्त्याच्या माध्यमातून युवकांना शांत करण्याचा प्रयत्न करत आहे. हा फक्त एक राजकीय स्वार्थ साधण्याचा मार्ग आहे, ज्यातून युवकांना काहीही लाभ मिळत नाही.

## *कविता*

### ।। नेता खाई चोखुनी आंबा ।।


जनतेला जात धर्म आरक्षण आणि मंदिर मस्जिद काबा, मीडियासाठी उघडला ह्यांनी पाकीट रूपी ढाबा,

मग प्रसार माध्यमे दाखवी यांचा नेता कसा खाई चोखूनी आंबा, सर्वांनी विचार करून राजकारणातून करा यांना लंबा...

# ‘राज्याला तंत्रज्ञानाची राजधानी बनवणार’ ,भाजपकडून वचनांचा पाऊस

**मुंबई** : महाराष्ट्राला जागतिक ‘फिनटेक’ व कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) राजधानी बनविण्याबरोबरच ५० लाख महिलांना लखपती दीदी, १० लाख नवीन उद्योजक, २५ लाख रोजगारनिर्मिती, १० लाख विद्यार्थ्यांना दरमहा १० हजार रुपये, अक्षय अन्न योजनेत कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना मोफत शिधा आदी आश्वासने भाजपच्या ‘संकल्प पत्रा’त देण्यात आली आहेत.

भाजपच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. महायुतीच्या दशसूत्री व्यतिरिक्त शेकडो आश्वासने भाजपने आपल्या जाहीरनाम्यात दिली आहेत. सोयाबीन, कापूस व अन्य उत्पादनांना किमान आधारभूत किमतीनुसार भाव मिळावा आणि त्यापेक्षा कमी दर बाजारपेठेत मिळाल्यास फरकाची रक्कम सरकार शेतकऱ्यांना देण्याचे आश्वासन भाजपने दिले आहे. महाराष्ट्र २०२७ पर्यंत डाळ उत्पादनात




आत्मनिर्भर करण्यासाठी प्रक्रिया केंद्रे उभारण्यात येतील. शेती उत्पादने निर्यातक्षम करण्यासाठी पॅकिंग हाऊसची उभाणी करून साठवण क्षमता व प्रक्रिया सुविधा तयार केल्या जातील. शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील एसजीएसटी अनुदान स्वरूपात परत करण्यात येईल, अशी अनेक आश्वासने भाजपच्या जाहीरनाम्यात येण्यात आली आहेत.

**जाहीरनाम्यातील मुख्य आश्र्वासने :**

– प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र

– अनुसूचित जाती, जमाती व ओबीसी उद्योजकांना १५ लाख रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्ज

– कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी यांत्रिक कृषी अभियान, ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर

– महाराष्ट्र दुध विकास अभियानांतर्गत २०३० पर्यंत दूध उत्पादन क्षमता ३०० लाख मेट्रिक टनांपर्यंत

– जळगाव, अमरावती, नांदेड व सोलापूर हे नवीन औद्योगिक जिल्हे, सोलापूरमध्ये फूड पार्क

– विदर्भ–मराठवाडा संरक्षण सर्किट कॉरिडॉर

– नवी मुंबईतील नयना प्रकल्पात एज्युसिटी, जागतिक पातळीवरील शिक्षण संस्थांना प्रोत्साहन

– खेळाडूंना आरोग्यविमा आणि आरोग्य कार्ड, सर्व विद्यापीठांमध्ये क्रीडा विज्ञान पदवी अभ्यासक्रम

– कोल्हापूरला जागतिक दर्जाचे फुटबॉल स्टेडिअम, नांदेडमध्ये अत्याधुनिक हॉकी स्टेडिअम

– प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात २०२९ पर्यंत डायलिसीस केंद्र, अतिदक्षता विभाग व ऑपरेशन थिएटर

– प्रत्येक पार्थिवावर सन्मानजनक अंत्यविधीसाठी उपाययोजना

– प्रत्येक गावातील २५ टक्के घरांना पाच वर्षांत सौर ऊर्जा

– ४०० वर्षांहून अधिक जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार

– ओबीसी, सामाजिक व आर्थिक दुर्बल घटक, भटक्या व विमुक्त जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षाशुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती

– शिक्षक व पोलीस दलातील रिक्त जागा भरण्यासाठी महाभरती

– सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये क्रीडा केंद्र

– सर्व शासकीय शाळांमध्ये अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा

– महारथी योजनेअंतर्गत रोबोटिक्स आणि महाविद्या कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली

– राज्यात ५० अत्याधुनिक कला स्टुडिओ

– डॉ. पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती अभियानात २०२९ पर्यंत सेंद्रिय शेतीचे क्षेत्र २५ लाख हेक्टरपर्यंत वाढविणे

– सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी गडकिल्ले विकास प्राधिकरण

– कौशल्य जनगणना, उद्योगांच्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन

– अर्थव्यवस्था २०२८ पर्यंत एक लाख कोटी डॉलर नेण्याचे उद्दिष्ट

– कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ – नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिकला एरोनॉटिकल व स्पेस उत्पादन केंद्र.

## तर... मविआचे कार्यकर्ते फडणवीस, अजित पवारांच्या बॅगा तपासतील, निवडणूक अधिकाऱ्यांनी बॅगेची तपासणी केल्यानंतर उद्धव ठाकरेंचा इशारा

**मुंबई :** राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलेलं आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. सध्या प्रचाराचा धडाका सुरु असून प्रचारासाठी दिल्लीतील दिग्गज नेते महाराष्ट्रात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आज माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची वणी या ठिकाणी जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना त्यांनी महायुतीच्या नेत्यांवर जोरदार हल्लाबोल केला.

दरम्यान, उद्धव ठाकरे हे सभेसाठी दाखल झाले असता निवडणूक अधिकाऱ्यांकडून त्यांच्या बॅगेची तपासणी करण्यात आली. यामुळे उद्धव ठाकरे यांनी सभेत बोलताना निवडणूक अधिकाऱ्यांना इशारा देत काही सवाल विचारले. ‘तुम्ही जशी माझी बॅग तपासली, तशीच पंतप्रधान मोदी, अमित शाह, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या बॅगा तपासल्या का? असा सवाल करत आता जर निवडणूक अधिकारी त्यांच्या बॅगा तपासणार नसतील तर महाविकास आघाडीचे कार्यकर्ते त्यांच्या बॅगा तपासतील’, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

मला जास्त भाषणे करण्याची गरज नाही. कारण लोक सांगत आहेत की, तुम्हाला विजय दिला. फक्त २० तारखेला कोणालाही डोळ्यावर पट्टी बांधू देऊ नका. आता आपल्या न्यायदेवतेच्या डोळ्यावरची पट्टी देखील काढली. त्यामुळे तुमच्याही डोळ्यावर पट्टी असण्याची गरज नाही. तुम्ही डोळसपणे मतदान करा. मी कोणत्याही माणसांना दोष देत नाही, तर मी यंत्रणेला दोष देत आहे. मी हेलिकॉप्टरने आलो तेव्हा माझ्या स्वागतासाठी ८ ते १० जण उभे होते. मी त्यांना विचारलं की काय करायचंय? ते म्हणाले बॅग तपासायची. त्यांना म्हटलं तपासा. आता जे तुमची तपासणी करतात त्यांची ओळखपत्र देखील तुम्ही तपासा. तसेच ते जसे तुमचे खिसे वैगेरे तपासतात तसं तुम्ही देखील त्यांचे खिसे तपासा. हा आपला अधिकार आहे. तुम्हाला जर तपासणी अधिकाऱ्यांनी आडवलं तर तर अधिकाऱ्यांच्या ओळखपत्रासह त्यांचे खिसे देखील तपासा, हा तुमचा अधिकार आहे, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

मी यंत्रणेला सांगतो, तुम्ही जशी माझी बॅग तपासली, तशीच पतंप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांची बॅग तपासली का? तपासायला हवी की नको? दाढीवाल्या शिंदेंची तपासायला हवी की नको? गुलाबी जॅकेटवाल्यांची तपासायला हवी की नको? फडणवीसांची बॅग तपासायला हवी की नको? पंतप्रधान मोदी महाराष्ट्रात सभेसाठी येतात. मोदी आल्यानंतर रस्ते बंद होतात. मग हे रस्त्याने सुसाट जातात. मात्र, पंतप्रधान मोदी असो किंवा अमित शाह असोत किंवा देवेंद्र फडणवीस, अजित पवार असोत. यांच्या बॅगा जर निवडणूक अधिकारी तपासणार नसतील तर महाविकास आघाडीचे कार्यकर्ते त्यांच्या बॅगा तपासतील. मग मात्र, पोलिसांनी मधे यायचं नाही. निवडणूक अधिकाऱ्यांनी मधे यायचं नाही. आमच्या बॅगा तपासण्याचा अधिकार जसा तुम्हाला आहे.

## धर्माचं राजकारण करणाऱ्या पक्षावर रितेश देशमुखची ‘लय भारी’ टीका

**लातूर :** लोकसभेला जे वारं होतं, तेच वारं आताही आहे, असे म्हणत अभिनेते रितेश देशमुख यांनी आपले लहान भाऊ धीरज विलासराव देशमुख यांच्यासाठी लातूर ग्रामीण येथे प्रचार सभा घेतली. यावेळी त्यांनी शिक्षणाचा लातूर पॅटर्न महाराष्ट्रात प्रसिद्ध असल्याचे सांगितले पण लातूरमधील मुलांनाच रोजगार नाही. रोजगार देण्याची सरकारची जबाबदारी आहे. पण लोकांकडे रोजगार नाही. पिकांना भाव नाही. येत्या २० तारखेला मतदारांनी मतदान करताना या मुद्द्यांचा विचार करावा, असे आवाहन रितेश देशमुख यांनी केले. तसेच भाजपाकडून होत असलेल्या धर्माच्या प्रचारावरही रितेश देशमुख यांनी जोरदार टीका केली.


भगवान श्रीकृष्णाचा दाखला देऊन रितेश देशमुख म्हणाले, कर्म हाच धर्म आहे. काम करत राहणे म्हणजे कर्म करणे आणि कर्म म्हणजेच धर्म. जो प्रामाणिकपणे काम करतो, त्यालाच धर्म करणे म्हणतात. पण जो काम करत नाही त्याला गरज पडते धर्माची. सगळे म्हणतात की धर्म धोक्यात आहे, प्रत्येक पक्ष म्हणतो धर्म धोक्यात आहे. धर्म बचाव, धर्माला वाचवा, असं म्हटलं जातंय. आमचा धर्म आम्हाला प्रिय आहे. प्रत्येक व्यक्तीला आपला धर्म प्रिय असलाच पाहिजे. खरं म्हणजे ते (राजकीय पक्ष) धर्माला प्रार्थना करतात की, आमचा पक्ष धोक्यात आहे, आम्हाला वाचवा. काही गरज नाही अशा भुलथापांना बळी पडायची.

रितेश देशमुख मतदारांना आवाहन करताना म्हणाले, जे धर्माची गोष्ट करतात, त्यांना सांगा धर्माचं आम्ही बघून घेतो, आधी आमच्या कामाचं बोला. आमच्या पिक–पाण्याला काय भाव देणार, आमच्या आई–बहिणी सुरक्षित आहेत की नाही, हे सांगा. २० नोव्हेंबरनंतर धीरज देशमुख यांच्याकडे फार मोठी जबाबदारी येणार आहे.

# महिला, शेतकऱ्यांवर आश्वासनांची खैरात; मविआचा ‘महाराष्ट्रनामा’ जाहीर

**मुंबई :** महिलांना महिना ३००० रुपये, ५०० रुपयांमध्ये वर्षाला सहा सिलिंडर, मासिक पाळीच्या काळात दोन दिवसांची ऐच्छिक रजा, सर्व नागरिकांना १०० युनिट मोफत वीज, २.५ लाख सरकारी रिक्त पदे भरणे तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी शक्ती कायदा अशी विविध आश्वासने असणारा महाविकास आघाडीचा ‘महाराष्ट्रनामा’ रविवारी प्रकाशित करण्यात आला.

महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसांत काय कामे करणार व पाच वर्षांत काय कामे करणार याचे आश्र्वासन जाहीरनाम्यातून देण्यात आले आहे. ही निवडणूक फक्त महाराष्ट्रासाठी नाही तर देशाचे भविष्य बदलणारी आहे. महाराष्ट्राच्या जनतेसाठी शेतकरी, तरुण, महिलांसाठी हे सरकार घालवणे गरजेचे आहे. भाजप युतीचे खोके सरकार सत्तेतून खाली खेचून महाविकास आघाडीचे आणा असे आवाहन काँग्रेस




अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी केले. जाहीरनामा प्रकाशन समारंभाला खरगे यांच्यासह शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत, राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसचे सरचिटणीस वेणुगोपाळ, रमेश चेन्नीथला, बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते.

**१०० दिवसांत काय करणार ?**

– महालक्ष्मी योजनेंतर्गत महिलांना प्रतिमहा ३ हजार, मोफत बस प्रवास

– स्वयंपाकाचे ५०० रुपयांमध्ये सहा गॅस सिलिंडर

– निर्भय महाराष्ट्र धोरण आखून महिलांना स्वसंरक्षणाचे धडे, शक्ती कायद्याची अंमलबजावणी

– महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीसाठी दोन दिवस ऐच्छिक रजा

– जन्माला आलेल्या प्रत्येक मुलीच्या नावे बँकेत ठरावीक रक्कम, १८ वर्षांनंतर एक लाख रुपये

– शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत कर्जमाफी, कर्जफेडीस ५० हजार सूट

– शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उच्चस्तरीय समिती

– तरुण पदवी–पदविकाधारक बेरोजगारांना दरमहा ४००० रुपये भत्ता

– युवकांच्या कल्याणासाठी ‘युवा आयोग’

– सरकारी रुग्णालयांत मोफत औषधे

– नवे औद्योगिक धोरण आखणार, महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देणार

– सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी स्वतंत्र मंत्रालय

– महाराष्ट्रात जातीनिहाय जनगणना करणार

– संजय गांधी निराधार योजनेच्या लाभाची रक्कम दीडवरून दोन हजार रु.

– दरमहा तीनशे युनिटपर्यंत वापर असणाऱ्या ग्राहकांना शंभर युनिटपर्यंतचे वीज बिल माफ

– सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना

– वृद्ध कलावंताच्या मानधन वाढ

– स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करणार,

– निवडणुका एकदस्यीय प्रभाग पद्धतीने

– शहरीकरणाचे आव्हान पेलण्यासाठी आणि त्याला योग्य दिशा देण्यासाठी ‘राज्य नागरी आयोग’

– इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम वेळेत करण्यासाठी आराखडा

– महायुतीने काढलेल्या अध्यादेशांचा फेरविचार करणार

– खासगी संस्था व व्यक्तींना भूखंड देण्याबाबत काढलेल्या आदेशांचा फेरविचार करणार

– जगभरातील मराठी आणि महाराष्ट्रातील परभाषिकांना मराठी भाषा शिकवण्यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन अभ्यासक्रम